**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक ११ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ.**
2. **निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर इंडिया आघाडीचा मोर्चा.**
3. **शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करणार-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक.**
4. **'हर घर तिरंगा २०२५' अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेतर्फे उद्या “तिरंगा मॅरेथॉन”चे आयोजन.**

**-----------------------------------**

महागाई भत्ता

राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तसंच निवृत्ती वेतन धारकांना आता ५३ ऐवजी ५५ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जानेवारीपासून या महागाई भत्त्याची थकबाकीही ऑगस्टच्या वेतनासोबत दिली जाईल. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं आज जारी केला.

**-----------------------------------**

निवासस्थानांचं उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत संसद सदस्यांसाठी बांधलेल्या १८४ निवासस्थानांचं उद्घाटन झालं. या संकुलाला कृष्णा, गोदावरी, कोसी आणि हुगळी या चार महान नद्यांची नावं देण्यात आली आहेत. या संकुलामुळे खासदारांचं जीवनमान सुधारेल आणि लोकांसाठी अधिक कार्यक्षम राहता येईल अशी आशा पंतप्रधानांनी व्यक्त केली. २०१४ नंतर ३५० पेक्षा जास्त घरं बांधण्यात आली असून, यामुळे खर्चातही मोठी बचत होणार आहे. हे संकुल ‘एक भारत श्रेष्ठ भारत’ च्या संकल्पनेचं प्रतीक असून, प्रत्येक प्रांताच्या सणांचं आयोजन इथं होण्याची इच्छा देखील त्यांनी व्यक्त केली.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी ३० सेकंद)***

***आज मेरे आपसे कुछ आग्रह भी है। यहाँ देश के अलग अलग राज्यों और क्षेत्रों के सांसद एक साथ रहेंगे। आपकी उपस्थिति यहाँ एक भारत, श्रेष्ठ भारत का प्रतीक बनेगी। हर प्रांत के पर्व त्योहारों का समय समय पर सामूहिक आयोजन होगा तो इस परिसर को चार चाँद लग जाएंगे। आप अपने क्षेत्र की जनता को भी बुलाकर इन कार्यक्रम में उनकी भागीदारी करवा सकते हैं। आप अपने अपने प्रांतों की भाषा के कुछ शब्द भी एक दूसरे को सिखाने का प्रयास कर सकते हैं।***

यावेळी पंतप्रधानांनी शेंदूर वृक्षाचं रोप लावलं, तसंच या संकुलांचं बांधकाम करणाऱ्या कामगारांशी संवाद साधला. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू, मनोहरलाल खट्टर आदी मान्यवर उपस्थित होते.

---

इंडिया आघाडी मोर्चा

निवडणूक आयोग पक्षपातीपणे काम करीत असल्याचा आरोप करुन, इंडिया आघाडीच्या खासदारांनी आज निवडणूक आयोगाच्या दिल्लीतल्या कार्यालयावर मोर्चा काढला. बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करण्याची मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. पोलिसांनी मोर्चा अडवला तेव्हा आंदोलनकर्त्या खासदारांनी रस्त्यावरच ठिय्या दिला. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्यासह अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.यावेळी काँगेस नेते यांनी हा संविधान वाचविण्यासाठीचा लढा आल्याचे म्हंटले आहे -

***(होल्ड बाईट - लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी)***

***सच्चाई देश के सामने है अब ये जो लडाई है ये राजनैतिक नहीं है, ये कॉन्स्टिट्यूशन की लड़ाई है, कॉन्स्टिट्यूशन को बचाने की लड़ाई है, 'वन मॅन वन वोट' कि लडाई है, इसलिए हमें सात प्युवर वोटर लिस्ट चाहिए.***

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, अखिलेश यादव यांच्यासह अनेक खासदार मोर्चात सहभागी झाले होते. दरम्यान, काँग्रेस शत्रुराष्ट्रांची भाषा बोलत असल्याचा आरोप केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केला आहे. नवी दिल्ली इथं ते पत्रकारपरिषदेत बोलत होते. हातून सत्ता गेल्यामुळे अराजक माजवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. घुसखोरांना मतदार घोषित करुन काँग्रेसला सत्ता मिळवायची आहे, असं ते म्हणाले.

-------------------------------------

स्वातंत्र्य दिन परेड- सरपंच निवड

ग्रामीण भाग समृध्द व्हावा, गाव सुजलाम सुफलाम व्हावे याकरिता गावाचा सर्वांगीण विकासाचे स्वप्न उराशी बाळगून कार्य करणाऱ्या नागपुर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील महिला सरपंच जयश्री धनंजय इंगोले यांनी देशभरातील महिलांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा कार्याची दखल थेट केंद्र आणि महाराष्ट्र सरकारने घेतली आहे..महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत येत्या 15 ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्वातंत्र्य दिन परेड समारंभासाठी विशेष निमंत्रित म्हणून सरपंच जयश्री धनंजय इंगोले यांची निवड झाली आहे. दरम्यान गावात झालेल्या कामांमध्ये जनसहभागाचे महत्व त्यांनी सांगितले -

***(होल्ड बाईट - सरपंच)***

***प्रत्येक लोकांचा लोकसहभाग जोपर्यंत आपल्याला मिळणार नाही तोपर्यंत आपण गावाच्या शाश्वत विकास किंवा गावाचे कोणतेही काम करू शकणार नाही. श्रमदान करून गावातील आम्ही कामं साधलेले आहेत. जल पुनर्भरण विहीर पुनर्भरण वॉटर रेनो हार्वेस्टिंग शंभर टक्के गाव वॉटर हार्वेस्टिंग झालेला आहे. महिला सक्षमीकरण.बालस्नेही पंचायत, महिलास्नेही पंचायत अशा अनेक कामाने माझ्या गावाला एक वेगळी वळण दिलेली आहे. शाश्वत विकासाच्या नऊ थीमचे अभ्यास करून शासनाच्या विविध योजना कशा राबवायचा महिलांना आपण एकत्रित घेऊन या प्रकारे अनेक काम आम्ही महिलांकडून करून घेतले.***

सरपंच जयश्री इंगोले यांनी केलेले कार्य देशातील सरपंच महिलांसाठी तसेच इतर महिलांसाठी प्रेरणादायी असून त्यांचा कार्याची दखल केंद्र आणि राज्य सरकारने घेतल्यामुळे नागपुर जिल्ह्यातील ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

-------------------------------------

स्कुल व्हॅन

शालेय बसचे वाढीव मासिक दर परवडत नसल्याने आपल्या मुलांच्या वाहतूकीसाठी अनाधिकृत रिक्षाचा पर्याय निवडणाऱ्या राज्यातील तमाम पालकांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने धाडसी पावले टाकली आहेत. शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन

विभागाकडून स्कूल व्हॅन परवाने वाटप खुले करण्यात येत आहेत. या बाबतची अधिसूचना  जारी होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. सरनाईक म्हणाले की, अत्याधुनिक सुरक्षा व सुविधांनी युक्त असलेली अधिकृत स्कूल व्हॅन धावती करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. परिवहन विभागाने बोलावलेल्या पालक आणि बस संघटना प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अनधिकृत वाहनांतून विद्यार्थी वाहतूक होत असल्याचा मुद्दा गाजला होता. देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा  आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. सदर वाहने BS-VI या श्रेणीतील असणारं आहेत. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश केला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली.

------------------------------------

'हर घर तिरंगा

केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा-२०२५' या अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या वतीने  उद्या मंगळवार १२ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० वाजता "तिरंगा मॅरेथॉन" आयोजन करण्यात आले आहे. नागपूरकरांनी अभियानात उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवित 'एक दौड देशभक्तीसाठी' उपक्रमात मोठ्या संख्येत सहभागी व्हावे असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे. ही मॅरेथॉन मुख्यमंत्री निवास 'रामगिरी पासून सुरु होईल. तर लेडीज क्लब चौक, जी.पी.ओ.चौक,आकाशवाणी चौक, विधान भवन चौक, महानगरपालिका प्रशासकीय इमारती, बिशप कॉटन शाळा होत, विदर्भ क्रिकेट असोसिएशन मैदान होत मेट्रो हाऊस, तिरपुडे महाविद्यालय, जापनीज गार्डन होत अनुराधा न्यायमूर्ती बंगला इथं समारोप होणार आहे.

------------------------------------

नवबौद्ध शिष्यवृत्ती

नागपूरच्या १२ अल्पसंख्याक समुदायातील नवबौद्ध विद्यार्थ्यांना आता परदेशात उच्च शिक्षणासाठी जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्व विद्यार्थ्यांची परदेशी शिष्यवृत्ती मंजूर झाली असून, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या विशेष हस्तक्षेप व प्रयत्नांतून ५२ लाखांपासून १ कोटी रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मंजूर झाली आहे.सर्व विद्यार्थ्यांनी “विदेशी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना” अंतर्गत अर्ज केले होते. मात्र तांत्रिक कारणे व प्रशासकीय अडथळ्यांमुळे शिष्यवृत्ती मंजुरी प्रक्रिया अडकली होती. परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना युनायटेड किंगडम व ऑस्ट्रेलियातील युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टल, युनिव्हर्सिटी ऑफ सिडनी आणि युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न येथे प्रवेश मिळाला आहे.

-------------------------------------

तलवार

नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील शूर सरदार रघुजी भोसले यांची महाराष्ट्र सरकारने लिलावात जिंकलेली तलवार आज लंडन इथं राज्य सरकारच्यावतीने ताब्यात घेण्यात आली. लवकरच महाराष्ट्रातील जनतेला पाहण्यासाठी ती उपलब्ध करुन देण्यात येईल अशी माहिती सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

-------------------------------------

हवामान

विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे.

-------------------------------------